लोकमत

# ॲडव्हेंचर ट्रेनिंग अकादमीतर्फे पर्यटकांना स्वसंरक्षणाचे धडे

**उधेवाडी । दुर्गम डोंगरात लष्करी संकल्पनेवर आधारित प्रशिक्षण । निवृत्त अधिकाऱ्यांचा सहभाग**

लोकमत न्यूज नेटवर्क

**लोणावळा :** राजमाची किल्ल्याजवळील उधेवाडी येथे शिरोता धरणाच्या काठावर जंगलात लष्करी प्रशिक्षण केंद्र (डेटा) सुरु केले आहे. पर्यटकांना लष्करी प्रशिक्षण देणारा देशातील हा पहिलाच उपक्रम आहे.

आजकाल दहशतवादी हल्ले कधी आणि कुठे होतील, याचा काही नेम नाही. त्यामुळे कायम सतर्क राहणे ही काळाचीच गरज आहे. केवळ असे हल्लेच नव्हे तर अनेकदा नैसर्गिक पूर, आगीच्या घटना अशा आकस्मिक संकटांशी सामना करण्याचीही वेळ येते, अशा प्रसंगी घाबरून न जाता स्वत:चा आणि इतरांचा बचाव कसा करायचा याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण प्रत्येकालाच मिळायला हवे, हीच गरज ओळखून डेला ॲडव्हेंचरचे प्रमुख जिमी मिस्त्री यांनी हा उपक्रम सुरु केला आहे.

२६/११ च्या मुंबईतील



राजमाची किल्ल्याजवळील उधेवाडी येथील जंगलात लष्करी प्रशिक्षण तळावर दिले जाणारे प्रशिक्षण.

## ब्लॅक कॅट कमांडोंकडूनही मार्गदर्शन

- येथील प्रशिक्षण अधिक परिणामकारक आणि शास्त्रशुद्ध होण्याचे मुख्य कारण म्हणजे इथे उभी केलेली लष्करातील निवृत्त अधिकाऱ्यांची भक्कम फळी. लष्कराच्या सदर्न कमांडचे माजी प्रमुख निवृत्त लेफ्टनंट जनरल रेमंड नऱ्होना यांच्या नेतृत्वाखाली जवानांची तरुण तुकडी येथे प्रशिक्षण देते. प्रत्यक्ष दहशतवाद्यांचा खात्मा करणारे ब्लॅक कॅट कमांडो देखील या तुकडीत आहेत.
- दहशतवादी हल्ल्याच्या प्रसंगी वा अन्य काही कारणाने उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत संकटाला घाबरुन न जाता त्यातून आपला बचाव कसा करायचा याचे तंत्र येथे शिकविले जाते. तोल सांभाळत पाईपवरुन चालणे, भिंत ओलांडणे, क्रॉलिंग करत पुढे सरकने, दोरीवर चढणे, दोरीच्या साहाय्याने तयार केलेला पूल ओलाडणे, आगीतून चालणे असे १९ प्रकारचे अडथळे पार करण्याचे प्रशिक्षण येथे दिले जाते. त्याचप्रमाणे अतिरेक्यांकडून अचानक गोळीबार झाल्यास गर्भगळीत न होता स्वत:चा व इतरांचा बचाव कसा करावा याचे तंत्रही येथे शिकविण्यात येते.

दहशतवादी हल्ल्यात शेकडो निरापराध लोक शहीद झाले. भविष्यात अशा घटना घडल्यास त्यांचा सामना कसा करावा याचे प्रशिक्षण नागरिकांना देण्याचे स्वप्न जिमी मिस्त्री यांनी प्रत्यक्षात आणले

शाळेतील आदिवासी मुलांना मोफत प्रशिक्षण देखील सुरु करण्यात आले आहे.

डाटाची स्वप्नात असलेली संकल्पना प्रत्यक्षात आली याचा मला विशेष आनंद आहे. कोणत्याही

धिराने तोंड देण्यासाठी व त्यातून आपला व इतरांचा बचाव करण्यासाठी प्रत्येक पुरुष, महिला आणि मुलांना प्रशिक्षित करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी भारतीय सेना दलातील दहशतवादी

लावणारे जवान, अधिकारी आणि ब्लॅक कॅट कमांडो यांना येथे प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले आहे. ज्या निरपराधांना आपला जीव दहशतवादी हल्ल्यात गमवावा लागला. त्या प्रत्येकाला डाटा मी